दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ●मंगळवार दि.३० सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ४५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 30 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 45 ● Pages 4 ● Rate 4 Rs

## शिक्षण विभागाचा तातडीने निर्णय

**धाराशिव**–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानंतर शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी तात्काळ राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क साधला आणि अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार, शिक्षण विभागाने बारावीच्या नियमित विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याची मुदत २० ऑक्टोबर पर्यंत वाढवली आहे. यासंदर्भात शिक्षण विभागामार्फत लवकरच परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.यासोबतच, बाह्य पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर पर्यंत, तर नवीन परीक्षा केंद्रांसाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत १० ऑक्टोबर पर्यंत वाढवण्यात आली आहे. या निर्णयामुळे पूर आणि अतिवृष्टीमुळे त्रस्त झालेल्या हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# ३४ आगार प्रमुखांवर होणार कारवाई परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात परतीच्या पावसामुळे अतिवृष्टीचे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना देखील एस टी महामंडळाच्या २५१ पैकी ३४ आगारातील आगरप्रमुख हे आपल्या कर्तव्यावर हजर नसल्याचे एका गोपनीय अहवालामध्ये निष्पन्न झाले आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून, बेजबाबदार वर्तन करुन आपल्या कर्तव्यात हलगर्जीपणा दाखवणाऱ्या आगारप्रमुखांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, असे निर्देश राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सोमवारी एसटी प्रशासनाला दिले. अशा प्रकारचे बेजबाबदार वर्तन भविष्यात खपवून घेतले जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.प्रताप सरनाईक म्हणाले, राज्यात गेल्या काही दिवसापासून परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. विशेषतः मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक रस्ते बंद आहेत. पुलावर पाणी आले आहे. अशा परिस्थितीमध्ये एसटीची वाहतूक अनेक ठिकाणी ठप्प झाली आहे. अनेक प्रवासी बसस्थानकावर अडकून पडले आहेत. अशा गंभीर परिस्थितीमध्ये आपल्या मुख्यालयात हजर राहून आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडण्याऐवजी काही आगार प्रमुख कर्तव्यावर गैरहजर असल्याचे दिसून आले आहे.

या आगारप्रमुखांनी परिस्थितीचे गांभीर्य न ओळखता अत्यंत बेजबाबदार वर्तन केले आहे. अशाप्रकारे आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या आगारप्रमुखांना संबंधित प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कारणे दाखवा नोटीस तातडीने बजावली पाहिजे. त्यामध्ये त्यांचा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्यावर प्रमादीय कारवाई करण्यात येईल. तसेच हे आगारप्रमुख ज्या विभाग नियंत्रकांच्या अखत्यारित काम करतात त्या विभाग नियंत्रकांना देखील याबाबत विचारणा केली जाणार आहे, असे ते म्हणाले.आगारप्रमुख हा एसटी प्रशासनाचा मुख्य घटक आहे. त्याच्या हाताखाली शेकडो कर्मचारी काम करत असतात. तो ज्या आगारात कार्यरत असतो, तेथे अनेक बसेस रात्रपाळीला मुक्कामी असतात. तसेच लाखो रुपये किमतीचे ऑइल, इंधन व इतर सुटे भाग तिथे असतात. याबरोबरच तिकीट विक्री मधून आलेली मोठी रक्कम देखील आगारात ठेवण्यात आलेली असते. अशा परिस्थितीमध्ये एक पालक म्हणून आगारप्रमुखांवर मोठी जबाबदारी असते. त्याने आगारात दररोज उपस्थित राहून या सर्वांना मार्गदर्शन करणे व त्यांच्यावर अंकुश ठेवणे गरजेचे असते. परंतु काही आगारप्रमुख हे आपल्या आगारात उपस्थित नसल्याचे सुरक्षा व दक्षता खात्याच्या गोपनीय अहवालात स्पष्ट झाले होते. कर्तव्यात कसूर करून बेजबाबदार वर्तन करणाऱ्या अशा आगरप्रमुखांच्यावर प्रशासन लवकरच कारवाई करेल! यापुढे अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत अशी दक्षता एसटी प्रशासनाने घ्यावी असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.



## उमरी टोल नाका बंद करण्याच्या मागणीवर शिवसेना उबाठा पक्ष ठाम,घडामोडीला आला वेग

**केज | प्रतिनिधी**

मौजे उमरी ता.केज येथील टोल नाक्यामुळे स्थानिक जनतेला होत असलेल्या त्रासा विरोधात शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने तीव्र भूमिका घेण्यात आली आहे.तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली केज तहसील कार्यालयास दिलेल्या निवेदनाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली असून,तातडीने टोल अधिकार्यांची बैठक घेण्याचे नियोजन सुरू केले आहे.स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार,उमरी टोल नाका चुकीच्या पद्धतीने सुरू करण्यात आला आहे.रस्त्याचे काम अद्याप पूर्ण न होता चढउतार करून टोल वसुलीची घाई करण्यात आल्याने वाहनचालक त्रस्त झाले आहेत.शिवाय परीसरा तील वाहनांना कोणतीही सूट न देता थेट टोल आकारला जात असल्याने




परिसरातील नागरिकां मध्ये संतापाची लाट उसळली आहे.याच पार्श्वभूमीवर दि.२९ सप्टेंबर रोजी शिवसेना तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वा खाली केज तहसील समोर रस्ता रोको करण्याच्या इशाऱ्यासह निवेदन सादर करण्यात आले.या निवेदनाची केज तहसीलदार राकेश गिड्डे यांनी गांभीर्याने दखल घेत तात्काळ टोल अधिकार्यांची बैठक बोलावून समस्ये वर तोडगा काढण्याचे नियोजन सुरू केले आहे.प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने शिवसेनेने प्रस्तावित रस्ता रोको आंदोलन तात्पुरते दहा दिवसांसाठी स्थगित करण्याचा निर्णयघेतला आहे.मात्र टोल नाका बंद करण्याचा निर्णय लवकर घेतला गेला नाही तर दि.१० ऑक्टोबर २०२५ रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र रस्ता रोको व आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा देण्यात आला आहे.या घडामोडींमुळे उमरी टोल नाक्यावरील परिस्थितीवर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या मागण्या व प्रशासनाचा पुढील निर्णय यावरच पुढील घडामोडी ठरणार आहेत.

## अर्धवट बंधाऱ्या मुळे सोयाबींसह जमीन खरवडून गेली : शेतकऱ्याची नुकसान भरपाईची मागणी

**केज | गौतम बचुटे**

केजडी नदीवरच्या अर्धवट बांधलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याची संरक्षण भिंत न बांधल्या मुळे एका शेतकऱ्याचे सोयाबीनच्या पिकांसह जमीन खरवडून गेल्याने मोठे नुकसान झालेले आहे.

केज तालुक्यातील शेलगाव गांजी शिवारातील केजडी नदीवर मागील दहा वर्षापूर्वी कोल्हापुरी पद्धतीचा अर्धवट बंधारा बांधलेला आहे. त्या बंधाऱ्याची संरक्षण भिंत बांधलेली नसल्याने या पूर्वी सन २०१९ मध्ये देखील प्रल्हाद कोंडीराम जाधव या शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले होते. मात्र त्या नंतरही सबंधित



विभाग आणि लघु पाटबंधारे विभाग यांनी त्याची दखल घेतली गेली नाही.

दरम्यान यावर्षी झालेल्या पावसाने या अर्धवट कोल्हापुरी बंधाऱ्याची संरक्षण भिंत नसल्याने पाणी प्रल्हाद जाधव यांच्या शेतात घुसून उभ्या सोयाबीनच्या पिकांसह जमीन २० फूट खोल आणि १०० फूट रुंद अशी जमीन खरवडून गेली आहे. त्यामुळे जाधव यांचे पीक आणि जमिनीचे मोठे नुकसान झाले असल्याने त्यांनी दि. २९ सप्टेंबर रोजी लघु पाटबंधारे विभागाला लेखी निवेदन दिले आहे. निवेदनाच्या प्रति खा. बजरंग सोनवणे, आ नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना दिल्या आहेत.

## शेत मजुरांनाही जीवनावश्यक वस्तूसह दहा हजार रु.अनुदान द्या : रिपाइंची मागणी

**केज | गौतम बचुटे**

अतिवृष्टीमुळे हाताला काम नसलेल्या शेतजुरांची उपासमार होत असल्याने त्यांनाही सरकारने प्रति कुटुंब दहा हजाराची मदत आणि जीवनावश्यक वस्तू देण्याची मागणी रिपाइं (आ.) च्या वतीने करण्यात आली आहे.केज तालुका रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) गटाच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केज तालुक्यातील सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे व अतीवृष्टीमुळे शेतकरी आणि शेतमजुर तसेच मागासवर्गीय मजुर व भुमिहीन लोंकाना हाताला काम नसल्यामुळे ग्रामीण आणि नागरी भागातील भुमीहीन शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे सरकारने प्रत्येक मजुराला दहा हजार रु आर्थिक अनुदान आणि अन्न धान्यासह जीवनावश्यक वस्तू देण्यात याव्यात. तसेच गायरान जमीन अतिक्रमण करून त्या कसणाऱ्या कास्तकऱ्यांना देखील नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. निवेनावर तालुकाध्यक्ष दिपक कांबळे यांच्यासह जिल्हा संघटक तर रवींद्र जोगदंड ल, तालुका सरचिटणीस गौतम बचुटे, ईश्वर सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, तालुका उपाध्यक्ष बाळासाहेब ओव्हाळ, तालुका उपाअध्यक्ष रमेश निशिगंध, आयटी सेलचे सुरज काळे, हरीश गायकवाड, विनोद शिंदे, बाबासाहेब जानराव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सुजात आंबेडकर यांची देवेंद्र ढाका यांच्या घरी सांत्वनपर भेट



**बीड | प्रतिनिधी**


वंचित बहुजन आघाडीचे युवानेते सुजात आंबेडकर यांनी बीड येथील पत्रकार देवेंद्र ढाका यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे दु:खात सहभागी होत सांत्वन केले.

या वेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण आबा जाधव, जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर,भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे कॅप्टन राजभाऊ आठवले अमरसिंह ढाका, सचिन मेघडंबर, समाजसेविका आम्रपाली साबळे,अँड. अविनाश गंडले, रामसिंग टाक,आदी मान्यवर उपस्थित होते.सांत्वन भेटीदरम्यान वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून ढाका कुटुंबियांच्या दुःखात सहभागी झाले.

## भव्य एल्गार महासभेत सुजात आंबेडकर यांचे मार्गदर्शन

**परळी | प्रतिनिधी**

परळी येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आयोजित भव्य एल्गार महासभा उत्साहात पार पडली. या महासभेस वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहिले.या प्रसंगी त्यांनी महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती,शेतकऱ्यांपुढील आव्हाने तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा मुद्दा उपस्थित करत वंचित बहुजन आघाडीची ध्येय-धोरणे स्पष्ट केली. शेतकरी, कामगार व वंचित घटकांच्या हक्कासाठी संघटित लढा देण्याचे आवाहन त्यांनी केले.महासभेस वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश महासचिव प्रा. किसन चव्हाण, राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद, युवा आघाडी राज्य सदस्य अमोल लांडगे,




सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे राज्य प्रवक्ते प्रशांत बोराडे, बीड पूर्व जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, पश्चिम जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, तालुकाध्यक्ष गौतम साळवे, बाबुराव मस्के यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.या महासभेमुळे परळी परिसरात वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे वातावरण पाहायला मिळाले.

# चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्या; अन्यथा नागपुरात 'मुंडन' आंदोलन

## तळोदा तालुक्यातील कोतवालांचा जिल्हा प्रशासनाला अंतिम इशारा

**नंदुरबार | दीपक गोसावी**

महसूल विभागाचा कणा असलेले महसूल सेवक (कोतवाल) यांना त्वरित राज्य चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा देण्यात यावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य महसूल सेवक (कोतवाल) संघटना, तालुका तळोदा युनिटने दिनांक २९/०९/२०२५ रोजी तळोदा तहसीलदार यांच्याकडे गंभीर इशारा देणारे निवेदन सादर केले. शासनाने मागण्या मान्य न केल्यास, तळोदा तालुक्यातील सर्व कोतवाल नागपूर येथील संविधान चौकात होणाऱ्या राज्यव्यापी आंदोलनात सहभागी होऊन 'मुंडन' आणि 'अर्धनग्न' आंदोलन करतील, असा अल्टिमेटम या निवेदनातून देण्यात आला आहे.

**२४ तास सेवा, पण दर्जा नाही**

तळोदा तालुक्यातील कोतवालांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महसूल सेवक (कोतवाल) हे तलाठी कार्यालय तसेच वरिष्ठ महसूल कार्यालयात २४ तास तत्पर सेवा देत असतात. महसुली कामांसोबतच निवडणूक, ई-पीक नोंदणी, नैसर्गिक आपत्ती पंचनामा सहाय्य, महसुली वसुली तसेच शिपाई, स्वच्छक, चौकीदार, संगणक चालक अशा अनेक अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडतात. इतके महत्त्वपूर्ण काम करत असतानाही आजतागायत कोतवाल पदास शासकीय चतुर्थ श्रेणीचा दर्जा मिळालेला नाही. परिणामी, शासकीय सेवा करत असतानाही त्यांच्यावर अन्याय होत आहे.यापूर्वी अनेकवेळा निवेदने देऊनही शासनाने दखल न घेतल्याने, तळोदा तालुक्यातील कोतवाल आता राज्यव्यापी आंदोलनात सक्रिय सहभाग घेणार आहेत. या निवेदनावर रावण ठाकरे, राजेंद्र शिरसाठ, नवनीत साळवे, विजय पिंपळे, संजय वळवी, गौतम भिलाव, योगेश वळवी, पल्लवी वळवी, विपिन पाडवी, राजकुमार पाडवी यांसह अनेक तळोदा तालुक्यातील महसूल सेवकांच्या सह्या आहेत.निवेदनाच्या शीर्षस्थानी तळोदा तालुका संघटनेचे अध्यक्ष स्वर्गीय संजयभाऊ धरम यांचा विशेष उल्लेख करण्यात आला असून, राज्यअध्यक्ष नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा लढा सुरू असल्याचे निवेदनात स्पष्ट केले आहे. तळोदा तालुक्यातील कोतवालांची ही रास्त मागणी तातडीने मंजूर करून न्याय द्यावा, अशी कळकळीची विनंती जिल्हा प्रशासनाकडे करण्यात आली आहे.



संपादकीय

# मुलांवर अभ्यासाचं ओझं नको

विद्यार्थीदशेमध्ये यश-अपयश हे प्रत्येकांच्या जीवनात येत असते. मात्र त्यावर मात करता आली पाहिजे. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना अभ्यासासाठी प्रोत्साहित करायला हवे. तसेच पालकांनी शैक्षणिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मुलांना प्रवृत्त केले पाहिजे. मुलांचा आत्मविश्वास वाढवायला हवा. त्यासाठी शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शिक्षणाची आवड निर्माण करा, ते ओझं वाटायला नको. कारण शिक्षण हेच मुलांच्या परिवर्तनाचे साधन आहे हे मुलांना पटवून दिले पाहिजे.मुलांना अभ्यासाची आवड नसते, ही काही नवीन गोष्ट नाही. अशी अनेक मुले आहेत ज्यांना अभ्यास ही शिक्षा वाटते आणि ते फक्त खेळावर लक्ष केंद्रित करतात. बाहेर आपले मित्र खेळतात मग आपणच का अभ्यासात डोकं खुपसून बसायचं, असे अनेक प्रश्न त्यांच्या मनात असतात. यात मुलांचाही दोष नाही; परंतु मुलांचा अभ्यास न करण्याच्या सवयीमुळे पालकांना त्यांची खूप चिंता वाटत असते. कारण मुलांनी अभ्यास केला नाही तर, साहजिकपणे शाळेत शिकवल्या जाणाऱ्या गोष्टी नीट समजणार नाही आणि मग ज्या वेगाने शिकायला हवे त्या गतीने ते सर्व काही शिकू शकणार नाही; परंतु मुलांच्या अभ्यासात रस नसण्यामागे इतरही अनेक कारणे असू शकतात. अशा परिस्थितीत, येथे जाणून घ्या की, पालक म्हणून तुम्ही मुलाला अभ्यास करण्यासाठी कसे प्रोत्साहित करू शकता. जेव्हा मुलं अभ्यास करत असतील तेव्हा तुम्ही त्याच्या जवळ बसू शकता. पण, मुलांचे टेन्शन वाढवणार नाही यासाठी प्रयत्न करा. जर कोणी मुलासोबत बसले तर त्यांना अभ्यास करण्याची इच्छा होते आणि कंटाळा येत नाही, पण पालकांच्या उपस्थितीमध्ये त्यांना भीती वाटत असेल किंवा आई-वडील मुलांना ओरडत असतील तर मुलं घाबरतात. त्यामुळे अभ्यासामधून त्यांचे पूर्णपणे लक्ष विचलित होते. आजच्या काळात अनेक मुले अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. याचा परिणाम परीक्षा जवळ आली की, वेगवेगळी कारणे सांगून पालकांमध्ये संभ्रम निर्माण करतात. तेव्हा परीक्षा केव्हाही सुरू झाली तरी मुलांनी नियमित अभ्यास करायला हवा. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलांना अभ्यास करण्यास प्रवृत्त करायला हवे. तरच मुलांना अभ्यास करण्यास गोडी लागेल. अनेक मुले अभ्यास करण्यास दुर्लक्ष करतात याची कारणे शोधली पासहिजेत. ती सुद्धा मुलांना विश्वासात घेऊन. त्यासाठी घरामध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण करायला हवे. म्हणजे मूल अभ्यास करण्यास प्रेरित होईल. तसेच त्यांना अभ्यास करण्यास उत्तेजन मिळेल.मुलांवर तशाप्रकारे प्रभाव पाडला पाहिजे. त्यासाठी पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक असायला हवा. मुले शाळेतून घरी आल्यावर लगेच त्यांना अभ्यासाला बसवू नये. त्यांना थोडा वेळ खेळण्यासाठी द्यावा. नंतर त्यांना अभ्यासाला बसवावे. अशावेळी घरातील वातावरण शांत ठेवावे. त्यांची बसण्याची जागा सुद्धा ठरवावी. त्याआधी शाळेच्या वेळेच्या नंतर अभ्यासासाठी वेळ निश्चित करावी. सर्व शाळांची वेळ सारखी नसते. म्हणजे मुलं वेळच्या वेळी अभ्यास करतील. बऱ्याच वेळा आई-वडील टीव्ही लावून एखादी मालिका बघतात. त्याच्या आवाजाचा परिणाम मुलांच्या अभ्यासावर होतो. तेव्हा पालकांनी सुद्धा मुलांच्या अभ्यासाच्या वेळेत टीव्हीला विश्रांती द्यावी. असं केल्याने मुलांना नियमित अभ्यासाच्या वेळेत अभ्यास करण्याची सवय लागते. यासाठी घरात अभ्यासासाठी वातावरण निर्माण करायला हवे. अभ्यासाच्या वेळेत पालकांनी आपल्या आवडी-निवडीवर निर्बंध घातले पाहिजेत. मुले चांगला अभ्यास करून उत्तीर्ण कसे होतील याकडे अधिक लक्ष द्यावे. प्रत्येक विषयांची शालांत स्तरापर्यंत पुस्तके असतात. त्यातील प्रत्येक परीक्षेला अभ्यासक्रम कोणता आहे. त्याचे परीक्षेपूर्वी अध्ययन झाले का? त्यातील कोणता भाग समजला नसेल तर अध्यापकांकडून समजून घ्यावा. म्हणजे परीक्षेला कोणत्याही प्रकारची शंका निर्माण होणार नाही. त्यामुळे ते परीक्षेत नेत्रदीपक प्रगती करू शकतात.आई-वडील आपल्यासाठी जी मेहनत घेतात त्याची मुलांना जाणीव असायला हवी. बऱ्याच मुलांना पालक सांगतात की, तू शाळेत पहिला आल्यास, तुला एक मोठं बक्षीस देणार असे आधीच त्यांना सांगायचं हे चुकीचं आहे. विशेष किंवा प्रथम श्रेणीत पास झाल्यास तुझ्या आवडीचे कपडे घेणार किंवा तुला टू व्हीलर घेऊन देणार? अशामुळे मुलांना उत्तेजन मिळते. आपण चांगल्या गुणांनी पास झाल्यास आपल्याला आपले आई-वडील बक्षीस देणार म्हणून मुले अभ्यास करण्याकडे अधिक लक्ष देतात. त्यासाठी त्यांना अधिक परिश्रम घ्यावे लागतात. अशावेळी अभ्यासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मुलांसाठी बक्षीस जरी मिळाले तरी मुलांच्या भवितव्याच्या दृष्टिकोनातून ते प्रयत्न करतात. काही ठिकाणी पर्यायी विषय असतात. त्यातील योग्य व आपल्या मुलांच्या आवडीचा विषय निवडावा. दहावीनंतर कला, वाणिज्य, विज्ञान किंवा इतर व्यावसायिक अभ्यासक्रम निवडण्याचा अंतिम निर्णय मुलांवर सोडवा. मात्र प्रत्येक शाखेविषयी माहिती त्याला देण्यात यावी. शेवटी आवड ही महत्त्वाची असते. मुलांच्या आवडीनुसार अभ्यासक्रम निवडल्यास तो अधिक जोमाने अभ्यास करेल. त्यासाठी प्रामाणिकपणे आपल्या भविष्याचा विचार करून अभ्यास करायला हवा. काही पालक अभ्यास करा म्हणून मुलांना प्रत्येक दिवशी सांगतात. तेव्हा असं न करता त्यांना आपल्या अभ्यासाची जाणीव व्हायला हवी. त्यांनी स्वत:हून अभ्यासाला बसायला हवं. त्यात त्यांनी आपण धड्याचे वाचन करून सारांश लेखन सुद्धा करायला हवं. म्हणजे अभ्यासाची नियमित सवय मुलांनीच लावायला हवी. महत्त्वाची बाब म्हणजे मुलांच्या आवडी-निवडीप्रमाणं मुलांना प्रोत्साहन द्यायला हवं.त्यासाठी विविध विषयांवर विचारवंतांची व्याख्याने आयोजित केली असतील तर अशा व्याख्यानांना मुलांना घेऊन जाणे. आपल्या परिसरात वैचारिक नाटक, चित्रपट मुलांना दाखवावे. ऐतिहासिक स्थळांना भेट देणे व मुलांना वर्षातून एकदा तरी सहल काढावी. त्याचप्रमाणे अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करण्यात यावं. जेणेकरून मुलांना प्रेरणा मिळून मुलांचा आत्मविश्वास वाढण्याला मदत होते. यामुळे अभ्यासाकडे अधिक मुले लक्ष देतात.त्यांना एक नव्याने अभ्यास करण्याची ऊर्जा मिळालेली असते. काही मुलांना आपण अभ्यास करताना आई किंवा वडील आपल्या सोबत असावे असे वाटते. तसं काही मुलं आई-वडिलांना बोलूनही दाखवितात. मात्र सध्याच्या धावपळीच्या जीवनात ते सर्वच पालकांना शक्य नसते. तरी आपण अभ्यास करताना पालकांनी थोडावेळ आपल्यासोबत बसावे असे मुलांना वाटते. तेवढाच आधार त्यांना वाटत असतो. काही शंका असल्यास ताबडतोब आपल्या शंकांचे निरसन होऊ शकते असे मुलांना वाटते. तेव्हा मुलांच्या आवडीप्रमाणे थोडावेळ मुलांबरोबर पालकांनी बसायला काहीच हरकत नाही. त्यामुळे त्यांना अभ्यास करण्यास धीर येतो. त्यांचा अभ्यासाचा उत्साह वाढतो. थोडक्यात असे म्हणता येईल की, मुलांना अभ्यासासाठी प्रोत्साहित करणे हे आई-वडिलांसाठी एक आवाहन असते. मात्र त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना अभ्यास करण्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण केल्यास मुलं बिनधास्तपणे अभ्यास करण्यास प्रोत्साहित होतील.

# सातपुड्यात आरोग्यवर्धक रानभाजींची रेलचेल

## औषधी गुणधर्म; सातपुड्यातील षौष्टिक व औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या बेदखल

**औषधी गुणधर्म असलेल्या सातपुड्यात अनेक वनस्पतीं आढळून येतात. खाद्यान्न म्हणून वापर होणार्या वनस्पतींपैकी कुठलीही एक भाजी आहारात घेतल्यास भाजीचे सेवन करणाऱ्या व्यक्तीला सहसा कुठल्याही आजाराची लागण होत नाही. या वनस्पतींसह सातपुड्यात उत्पादित होणारी भगर, भादी, मोर हे घटक आहारात घेतल्यास मानवाचे आयुष्यमान वाढण्यास देखील मदत होत आहे.**
**-जोब्या जेगला वळवी,शेतकरी, असली ता.धडगाव**



**मोलगी । रविंद्र वळवी**

चवदारच नव्हे तर औषधी गुणधर्म असणाऱ्या पौष्टिक रानभाज्या सातपुड्यात दऱ्या खोऱ्यात मुबलक प्रमाणात मिळत आहेत. त्या रानावनात नैसर्गिकरित्या उगवलेल्या असल्याने त्या सातपुड्याच्या मोलगी व धडगाव परिसरात अगदी निशुल्क उपलब्ध झाल्या आहेत. या रानभाज्या निशुल्क मिळत असल्याने या भाज्यांची खरी किंमत कळत नाही, परंतु त्या अनेक आजारांवर उपायकारक आहे. या भाज्यांची प्रशासकीय पातळीवर विकासाच्या दिशेने दखल घेणे अपेक्षित आहे. सातपुड्यात अनेक औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पती, झुडूपे आढळून येतात, त्यापैकी बहुतांश वनस्पतींचा पाला, फुले, फळे यांचा खाद्यान्न म्हणून वापर होत आहे. या खाद्यान्नचा आदिवासींमधील विविध मौखिक साहित्यांमध्ये उल्लेख होतांना दिसत आहे. प्रामुख्याने डाब राजमंडलच्या कहाण्या, गितांसह पारंपरिक लग्नगिते, होळी गीतांमध्येही होत आहे. या रानभाज्यांचा पिढ्यानपिढ्यान अन्न म्हणून वापर केला जात आहे. त्यामुळे या भाज्यांचा शोध आदिवासींच्या पूर्वजांनीच लावला आहे हे सिद्ध होत आहे. सुरुवातीच्या काळात मानवाला अन्न हे जंगल व आसपासच्या परिसरातूनच मिळत असे. यात कंदमुळे, जंगलातून अपोआप मिळणारी फळे व रानभाज्यांचा समावेश होतो. माणसाने शेती करायला सुरुवात केली, त्याच्या खानपानाच्या सवयी बदलल्याचे दिसून येत आहे.शहरी भागात कृषीव्यवस्थेच्या बदलामुळे कोबी, फ्लॉवर, सिमला मिरची तसेच विविध विदेशी भाज्या मिळत असल्या तरी सातपुड्यातील आदिवासी बांधव ऋतू व काळानुरुप पोवाळ्या (सनाम), माठला, उखीवळा, आंबाडा, शेल्टा, शेवगी पाला, उंबरपाला, सिचपाला, मोखं, सिरीवाटा यासह अनेक वनस्पतींचा पाला, फुले, मुळे व फळे दैनंदिन आहारातील खाद्यान्न म्हणून वापर करीत आहेत. या भाज्यां धडगाव व मोलगी भागात सहज मिळत असून त्यामुळे आदिवासी बांधवांना कुठलीही किंमत मोजावी लागत नाही त्यात कंदवर्गीय, झुडूपवर्गीय, वेलवर्गीय, वृक्षवर्गीयांसह आळंबीही उपलब्ध होते. परंतु आळंबी काही अंशी कालबाह्य देखील ठरत आहे. या भाज्यांच्या विकासासाठी उपाययोजना होणे आवश्यक आहे.

### जैव विविधता पडताळली जावी

**रानभाज्यांचा प्रशासकीय पातळीवर दखल घेत त्यातील औषधी गुणधर्म पडताळून पाहणे गरजेचे आहे. रानभाज्या या ठराविक मातीत व वातावरणातच उपलब्ध होतात. त्यामुळे या नैसर्गिक संपत्तीतील जैव विविधता ओरबाडली जाणार नाही, याची दक्षताही घेतली गेली पाहिजे. या भाज्या रानभाज्या असल्या तरी त्यांचीही शेती करता येऊ शकते का? या दिशेने प्रशासनाचे पाऊल पडल्यास या भाज्या निश्चितच विकासाच्या वाटेवर येतील पर्यायाने प्रत्येक घटकातील बांधवांना पौष्टिक तथा औषधी गुणधर्म असलेल्या भाज्या उपलब्ध होतील. त्यातून आरोग्यदायी समाज निर्माण होईल. शिवाय दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना त्यातून रोजगार देखील उपलब्ध होऊ शकेल.**

### काही भाज्या शेतात नव्हे जंगलातच वाढतात

**सातपुड्यात आढळून येणाऱ्या वनस्पतीपैकी बहुतांश वनस्पतीं या नैसर्गिकरित्या रानातच वाढतात. त्याची शेती केल्यास किंवा त्याची बागेत लागवड केल्यास त्या वाढत नाही. त्यामुळे सातपुड्यातील आदिवासी बांधव काही भाज्यांचा साठा करीत नाही. किंवा त्यांच्या बियाही साठवून ठेवत नाही. प्रशासकीय पातळीवर या भाज्यांचा विकास करतांना अशा काही भाज्यांचीही निवड होणे काळाची गरज आहे.**

# धानोरा रोडच्या होणाऱ्या कामाचे श्रेय फक्त जनतेलाच-बीड शहर बचाव मंच

## कोणत्याही प्रस्थापित श्रेय लाट्या दिवट्यांनी श्रेय लाटू नये बीड शहर बचाव मंचाने ठणकावले

## न.प.बीड ने सर्वात आधी बीड शहर बचाव मंचाला सुरुवात होणाऱ्या कामाची माहिती कळवली

**बीड । प्रतिनिधि**

धानोरा रोडच्या सुरू होणाऱ्या कामाचे श्रेय फक्त सातत्याने आंदोलने करणाऱ्या स्थानिक जनतेच्या प्रयत्नांनाच आहे. कोणत्याही प्रस्थापित घराणेबाज श्रेय लाट्या दिवट्यांनी याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये असे बीड शहर बचाव मंच सर्व प्रस्थापित दिवट्यांना ठणकावत आहे. धानोरा रोडची स्थानिक जनता तसेच या रोडवर असणाऱ्या नऊ शाळेंमधील विद्यार्थी व त्यांचे पालक, या शाळेंमध्ये कार्यरत असलेले सर्व कर्मचारी अध्यापक व शिक्षक वर्ग, विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी सर्व वाहनधारक, वाहन चालक मंडळी, धानोरा रोडशी जोडलेली सर्व छोटी गावखेडी, या गावांमधून बीड शहराला दूध आणि भाजीपाला पुरवठा करणारे सर्व शेतकरी अशी सर्वच जनता गेल्या वीस वर्षापासून भीषण हाल अपेष्टा या धानोरा रोडच्या दुर्दशेमुळे सहन करत आलेली आहे तसेच या रोडच्या विकासाच्या कामासाठी आंदोलने करत आलेली आहे. स्थानिक जनता गेल्या २० वर्षापासून सतत या रोडच्या विकास कामांसाठी संघर्ष करत आहे. या सर्व स्थानिक जनतेने वेळोवेळी या रस्त्याच्या विकासासाठी मोठी आंदोलने केली आहेत. स्थानिक जनतेने अनेक वेळा या रोडच्या विकासासाठी निवेदने दिली आहेत. या सर्व गतकाळामध्ये ही सर्व प्रस्थापित घराने बाज 'श्रेय लाटू दिवटे कमिटी' आणि श्रेय लाटू लोकप्रतिनिधी दिवटे मंडळी कुठे होती..??

ही सर्व दिवटे मंडळी विकासाचे दिवे नेमके कुठ लावत बसलेली होती ? ज्या प्रकारे धानोरा रोडची दुर्दशा झाली आहे तशीच दुर्दशा सर्व शहराची आज झालेली आहे. या प्रस्थापित दिवट्यांनी काही कामे गुत्तेदार म्हणून जरी केलेली असतील तरी त्याचेही तीन तेरा नऊ बारा वाजलेले आहेत. बीड शहरात अतिशय निकृष्ट दर्जाची बोगस कामे या लोकांनी केलेली आहेत. यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये आपण बीड शहराचे चाललेले हाल पाहत आहोत. धांडे नगर,



स्वराज्य नगर भागामध्ये नागरिक काय मरणांतक हाल अपेष्टा सहन करीत आहेत हे आपण सर्वजण रोज पहात आहोत. शहराच्या या झालेल्या दुर्दशेचे श्रेय याच सर्व प्रस्थापित दिवटे कमिटीला जाते. जसे एखाद्या रस्त्याचा निधी मंजूर झाल्यानंतर श्रेय लाटण्यासाठी हे सर्वजण पुढे येतात तसेच शहरातील झालेल्या दुर्दशेची जबाबदारी घेण्यासाठी या सर्वांनी पुढे येऊन त्याचेही श्रेय घेतलेच पाहिजे. धानोरा रोड साठी यापूर्वीही मंजूर झालेले निधी कुठे कुठे वापरण्यात आले आहेत..? त्याचे काय केले हेही जनतेला समोर येऊन सांगावे. धानोरा रोडचा विकास जाणीवपूर्वक का प्रलंबित ठेवला याचीही कारणे जनतेपुढे येऊन द्यावीत. प्रस्थापित घराण्यांच्या प्रॉपर्टीज-इस्टेटस् ज्या ठिकाणी आहेत तिथे सिमेंट रोड,नाल्या रस्ते,दिवे, सर्व सुविधा आधी निर्माण केल्या जातात. मग दरवर्षी नगरपालिकेचा कर भरणाऱ्या जनतेला या सुविधा का मिळत नाहीत..?? तुमच्या तीन-तीन पिढ्या सत्ता भोगून राज्य करून जातात तरी जनतेच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न 'सुटतच' नाहीत हा कसला विकास आहे, ही विकासाची कुठली पद्धत आहे...

?? अटल अमृत जल योजना व भुयारी गटार योजना का कार्यान्वित होत नाहीत, या योजनांची सद्यस्थिती काय आहे आणि या स्थितीची जबाबदारी कोणाची, याचे श्रेय कोणाचे, यासंदर्भातील जनतेच्या प्रश्नांची सर्व प्रस्थापित दिवट्यांनी व प्रस्थापित लोकप्रतिनिधींनी समोर येऊन उत्तरे द्यावीत. इतर मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींचा बीड शहराच्या विकास कामांमध्ये शून्य सहभाग आहे. त्यांचे या बीड शहरांमध्ये कसलेही योगदान नाही. त्यांनी आपल्या मतदारसंघातील नगरपालिका चांगल्या सांभाळाव्यात तिथेही खूप मोठी दुर्दशा आहे. तिथल्या गैरकारभाराची भांडी फोड करण्याची वेळ आमच्यावर आणू नका. इतर मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींनी फक्त आपल्याच मतदारसंघातील नगरपालिका नीट सांभाळाव्यात, बीड शहरांमध्ये नाक खुपसण्याची गरज नाही. तुमच्या नगरपालिकेतील गैरकारभाराचे वाभाडे काढायला आम्हाला वेळ लागणार नाही. धानोरा रोडच्या विकासासाठी जो निधी मंजूर झाला आहे त्याचे श्रेय फक्त स्थानिक जनतेच्या आंदोलनालाच आहे. तरी सर्व श्रेय लाटू प्रस्थापित दिवट्यांनी व लोकप्रतिनिधींनी याचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नका, असे बीड शहर बचाव मंचाच्यावतीने ठणकावून सांगण्यात येत आहे.

## नाथ बायो जीन्स (इं) लि.कंपनीकडून सुजलेगाव येथे

# नाथ संकेत ११ ११वाणाच्या कापुस पिका विषयी मार्गदर्शन

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

तालुक्यातील विविध प्रकारचे बियाणे कृषी उत्पन्न बाजार समिती मिळत असतात विविध प्रकारचे बियाणे मार्केट मध्ये उपलब्ध असतात व दुकानदार पटवून देत असतो. मात्र एक कंपनी अशी पण आहे ते प्रत्येक्षात शेतकर्यांचया बांदावर जाऊन शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन करत असतात ते पण प्रत्यक्षात नाथ बायो जीन्स (इं) कंपनीकडून मात्र थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन व छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या वरिष्ठानी मौ.सुजलेगाव येथे मार्गदर्शन पर आयोजन करण्यात आले होते विशेषता आजुबाजुच्या गावातुन शेतकर्यांनी मार्गदर्शन पर कार्यक्रमाला सुजलेगाव येथे शेतकऱ्यांनी भर भर भरून प्रतिसाद दिला होता शेतकऱ्यांनी आपल्या शेतीची प्रगती साधण्यासाठी नाथ संकेत ११ ११ या वाणाची लागवड करावी जेणेकरून आपली शेती आपणास खूपच फायदेशीर ठरेल नांदेड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी नाथ संकेत ११ ११ या वाहनाची लागवड केली आहे आपण प्रत्यक्षरीत्या सुजलेगाव ता.नायगाव जि. नांदेड येथील प्रगतशील शेतकरी विठ्ठल मारुती कस्तुरे यांच्या शेतातातील नाथ संकेत लागवड केलेली आहे पहावी पावसाचे प्रमाण जास्तीचे असले तरी या वाणाला काही फरक पडणार नाही म्हणून आपण नाथ संकेत या वाहनाची जास्तीत जास्त लागवड करावी असे मार्गदर्शन नाथ बायो जीन्स इं. लि. छत्रपती संभाजी नगर कंपनीचे विभागीय अधिकारी मा. पांडुरंग देशमुख साहेब



यांनी शेतकऱ्यांना अतिशय बारकाईने व उत्तम प्रकारे मार्गदर्शन करण्यात तर आलेच पण शेतकऱ्यांना समजेल अशा प्रकारे वरिष्ठांकडून मार्गदर्शन केलेनांदेड जिल्हा प्रतिनिधी श्याम पाटील व हनुमान कृषी सेवा केंद्र नायगाव चे संचालक प्रकाश पाटील भरकाड नायगाव तालुका प्रतिनिधी कृष्णा शहापुरे भोकर प्रतिनिधी संजय जाधव व आजूबाजूच्या हंगरगा कोटाळा मोरईकळी शेळगाव छत्री कोकलेगाव व सुजलेगाव येथील अनेक शेतकरी उपस्थित होते शेळगाव छत्री येथील प्रगतशील शेतकरी उत्तम सालेगाये यांनी मागील वर्षे २० गुंठ्यांत नाथ संकेत ११ ११या वाणाची लागवड केली होती त्यांनी या वाणाबद्दल आपले मागील वर्षाचे अनुभव सांगितले त्यांनी १४ क्विंटल असं उत्पादन झाले असे सांगण्यात आले सुजलेगाव येथे भरभरून प्रतिसाद देत पाचशे ते सातशे शेतकर्यांने गर्दी जमवली होती नांदेड प्रतिनिधी श्याम पाटील यांनी शेतकरयांना योग्य असे मार्गदर्शन तर केलेच आपण या भरघोस उत्पादन देणाऱ्या नाथ बायो जीन्स (इं) ११ ११ या कपास बियाण्याचे लागवड करावी व स्वतः वरिष्ठ अधिकारया सोबत कस्तुरे यांचा प्लॉट चारी बाजूने फिरून मार्गदर्शन व वैशिष्ट्ये सांगण्यात आले व शेतकऱ्यांना पटेल जोगी समजून सांगण्यात आले आपण पण ह्या बियाण्याची लागवड करावी व भरघोस उत्पादन घ्यावे असे उत्तम प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले जमलेल्या सर्व शेतकऱ्यांनी ह्या नात बायो जीन्स (इं) आम्हीपण सर्व शेतकऱ्यांनी मिळून लागवड करू असे शेतकऱ्याकडून प्रतिसाद देण्यात तर आले ,अनेक शेतकऱ्यांनी आपला अनुभव सांगितला त्यानंतर कंपनीचे लोहा तालुका प्रतिनिधी गुरुनाथ सालेगाये यांनी आभार प्रदर्शन केले व सर्व शेतकऱ्यांनी पुढच्या वर्षी नात संकेत ११ ११ खरेदी करणार असे सांगितले व कार्यक्रमाची सांगता झाली..

# आमदार मुंदडा पोहोचल्या थेट परप्रांतीय मजुरांच्या पालावर

**केज । गौतम बचुटे**

अतिवृष्टी आणि गंभीर पूर परिस्थितीमुळे परराज्यासह इतर जिल्ह्यातून सोयाबीन कापणीसाठी आलेल्या मजुरांच्या व्यथा ऐकून केज मतदार संघाच्या आमदार सौ नमिताताई मुंदडा, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे आणि तहसीलदार राकेश गिड्डे हे व्यापारी संघाच्या वृत्तीने दिलेल्या मदतीतून किराणा सामानाचे किट घेऊन थेट त्यांच्या पालावर पोहोचले.केज तालुक्यातील अनेक गावात सोयाबीन काढणीसाठी मध्यप्रदेश, खानदेश, विदर्भ आणि बुलढाणा, जालना, परभणी या जिल्ह्यातून मजूर आलेले आहेत. अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने त्यांच्या झोपड्या पाणी शिरले असल्याने किराणा सामानासह त्यांचे अंथरूण आणि पांघरुण यासह कपडे भिजून गेले आहेत. त्यामुळे तहसीलदार राकेश गिड्डे यांना ही माहिती पत्रकार गौतम बचुटे यांनी देताच त्यांनी व्यापारी महासंघाच्या आर्थिक सहाय्याने त्या मजुरांना जीवनावश्यक वस्तू आणि ताडपत्री देण्याची तरतूद केली.

दरम्यान दि. २९ सप्टेंबर रोजी केज विधासभा मतदार संघाच्या आ नमिताताई मुंदडा या केज येथील तहसील कार्यालयात आढावा बैठीसाठी आल्या होत्या. त्यावेळी तहसीलदार राकेश गिड्डे यांनी त्यांना मजुरांच्या मदती बाबत माहिती देताच आमदार मुंदडा या थेट केज-कळंब रोड लगत साळेगाव येथील वीज उपकेंद्रा जवळ राहत असलेल्या परप्रांतीय मजुरांच्या पालावर पोहोचल्या. यावेळी त्यांच्या सोबत सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार राकेश गिड्डे, गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, नायब तहसीलदार आशा वाघ-गायकवाड, नायब तहसीलदार अशोक भंडारे, माजी उपसभापती पापा शिंदे, भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्हॉईस चेअरमन डॉ. वासुदेव नेहरकर, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी, सचिव सुहास चिद्रवार, सरपंच कैलास जाधव पाटील, गौतम बचुटे, संतोष गालफाडे, परमेश्वर लांडगे, बलभीम बचुटे, रवि गायकवाड, मंडळ अधिकारी मस्के, ग्राम महसूल अधिकारी शुभम गाडे, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय गव्हाणे, नारायण लांडगे, सुधाकर इंगळे हे उपस्थित होते.

सोयाबीन कापणीसाठी आलेल्या मजुरांची माहिती मिळताच तहसीलदार राकेश गिड्डे यांनी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी, सचिव सुहास चिद्रावर, विकास मिरगणे, लोकरे या व्यापाऱ्यांशी संपर्क साधल्याने अवघ्या एक तासात सर्व नियोजन झाले. त्या बद्दल नागरिकांतून त्यांचे कौतुक होत आहे.



**विस्थापित मजूर कुटुंबांना जेवढी मदत लागेल ती देण्यासाठी प्रयत्न करू त्या संदर्भात आम्ही कारवाई करीत आहोत–आ.नमिता मुंदडा**

### यांनीही केली मदत !

**परमेश्वर लांडगे, रवि गायकवाड, यांनी त्यांच्या जवळचे प्लास्टिकचे पोते तर बलभीम बचुटे, वैशाली बचुटे आणि संगीता बचुटे यांनी त्या मजुरांना कामात वापरण्यासाठी जुने कपडे देऊन मदत केली.आमदार मुंदडा पोहोचल्या थेट परप्रांतीय मजुरांच्या पालावर**

### बिस्कीट पुडा पाहताच चेहऱ्यावर आनंद फुलला

**या मजुरांना किराणा सामान आणि त्यात मुलासाठी बिस्कीट असलेले पाहताच एका दोन वर्षाच्या मुलाने बिस्कीट पुडा घेऊन आनंदाने नाचू लागला आणि त्या निरागस मुलाच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता.**

## ओल्या दुष्काळामुळे विद्यार्थ्यांवर संकट

# सम्यक विद्यार्थी आंदोलनाची मुख्यमंत्र्यां कडे शिक्षण फी माफीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या ओल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनतेला मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या संकटामुळे विद्यार्थ्यांचेही शैक्षणिक भविष्य अंधारात सापडण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या बीड जिल्हाध्यक्ष रोहन मगर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठवून संपूर्ण मराठवाड्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, केवळ शेतकरीच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्याची जनता या नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडली आहे. या भागातील नागरिकांना सावरण्यासाठी ८ ते ९ महिन्यांचा कालावधी लागणार असून, दरम्यान अनेक विद्यार्थ्यांच्या परीक्षा व प्रवेश प्रक्रिया होणार आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्यावर शैक्षणिक फीचा बोजा टाकणे अन्यायकारक ठरेल.यासाठी शासनाने दुष्काळी मदतीसह शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे आणि सर्व शैक्षणिक फी संपूर्णपणे माफ करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या मागणीचा गांभीर्याने विचार न झाल्यास, सम्यक विद्यार्थी आंदोलन बीड जिल्ह्याच्या वतीने व्यापक स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही रोहन मगर यांनी दिला आहे. यामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या परिस्थितीला शासन आणि प्रशासन जबाबदार राहील, असा ठणकावाही या निवेदनातून करण्यात आला आहे




# अहिल्यानगरमध्ये खासदार लंके यांच्याकडून पूरस्थितीची पाहणी

## मुसळधार पावसामुळे पूरस्थिती गंभीर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मागील २४ तासांत तब्बल १३० मिमी पावसाची नोंद झाल्याने शहर व परिसरात सीना नदीला पूर आला आहे. परिणामी नालेगाव, दातारंगे मळा, सताळकर मळा यांसह अनेक भागांत नागरिकांच्या घरात पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

गंभीर परिस्थितीची दखल घेत खासदार निलेश लंके यांनी स्वतः पूरग्रस्त भागात जाऊन पाहणी केली. ते पाण्यात उतरून नागरिकांपर्यंत पोहोचले, त्यांच्या हालअपेष्टा जाणून घेतल्या व आवश्यक मदतीचे आश्वासन दिले.यावेळी खासदार लंके यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना तात्काळ नुकसानीची नोंद घेऊन रेस्क्यू व आपत्ती व्यवस्थापन पथके पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच महा वितरण अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून, पाण्यात करंट जाण्याचा धोका टाळण्यासाठी वीजपुरवठा सुरक्षित करण्याचे आदेश दिले.पाहणीदरम्यान नगरसेवक योगिराज गाडे, विक्रम राठोड, दिलदारसिंग बिर, गिरीश जाधव, मंदार मुले, राकेश बोगवट, प्रथमेश महिंदरकर, ओम काले, शुभम मिरांडे, महेश शेलके, अक्षय नागपूरे आदी मान्यवर उपस्थित होते.खासदार लंके यांनी नागरिकांच्या तक्रारी शांतपणे ऐकून घेतल्या व परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत सुरक्षित स्थळी हलविण्याचा सल्ला दिला.पूरामुळे शेती, घरे व जनावरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सरकारने तात्काळ 'ओला दुष्काळ' जाहीर करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदारांनी केली. देवटाकळी तालुका शेवगाव येथे रविवारी सकाळी पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी खासदार लंके यांच्याकडून लष्कर प्रशासनाशी संपर्क करून हेलिकॉप्टर ने मदत करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर लष्कर प्रशासनाने तत्काळ हेलिकॉप्टर पाठवून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले.



# संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करून पूरग्रस्त आणि शेतकऱ्यांना तात्काळ भरघोस मदत आणि संपूर्ण कर्जमाफी करावी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसापासून अतिवृष्टीने त्रस्त झाला आहे.या आलेल्या महाभयंकर पुरामुळे सर्व ग्रामीण भाग व शेती आणि शेतकरी अडचणीत सापडून हवालदिल झाला आहे.त्यामुळे आज संभाजी ब्रिगेड बीड पूर्व च्या वतीने सत्ताधारी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या घरासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले सध्या जिल्ह्याच्या सर्वदूर भागात शेतकऱ्यांची पिके तर पूर्णपणे उध्वस्त झालेली आहेतच परंतु पुराच्या पाण्यामुळे शेत जमीन सुद्धा खरडून गेली आहे.तसेच अनेक गावेच्या गावे पुराखाली गेलेली असल्यामुळे कुटुंबच्या कुटुंब उध्वस्त झाले आहेत.तसेच,जनावरे आणि गुरेढोरे मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडले आहेत.शेती सोबतच घरदार,संसाराला लागणारे सर्व साहित्य आणि मुलांच्या शैक्षणिक साहित्याचे या पुराच्या पाण्यात अतोनात नुकसान झाले आहे.. हातामध्ये आलेले पीक पूर्णपणे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांची जगण्याची उमेद कमजोर झाली आहे.चारही बाजूंनी तो भयानक संकटात सापडलेला असून येणाऱ्या काळात निराशा आणि नुकसानीमुळे आत्महत्या वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अशावेळी शेतकरी आणि पूरग्रस्त लोकांना आधार देणे, त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करणे,त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन त्यांना धीर देणे हे महाराष्ट्राचे जागृत आणि संवेदनशील नागरिक म्हणून आपले सर्वांचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीला ज्या ज्या प्रकारचे सहकार्य या आपत्तीग्रस्तांना करता येईल ते प्रत्येकाने करावे.सर्व स्तरातील लोकांनी या अस्मानी संकटातून सावरण्यासाठी सर्वोतोपरी सहाय्य करावे.आमदार, नोकरदार, व्यापारी,उद्योगपती,समाजातील श्रीमंत वर्ग,सर्व शैक्षणिक संस्था,सर्व हिंदी-मराठी व इतर चित्रपट श्रृष्टी,टिव्ही चॅनल्स आणि सर्व धार्मिक स्थळे या सर्वांनी जेवढी जास्त मदत पैशाच्या, वस्तूंच्या,संसार उपयोगी साहित्याच्या स्वरूपात करता येईल ती केली पाहिजे.सरकारने त्यांच्या मानसिकतेचा गांभीर्याने विचार करून त्यांना या नैराश्येतून बाहेर काढण्यासाठी आपली तिजोरी खुली करावी.कोणतेही निकष न लावता व नियमांच्या चाकोरीत न अडकता जनतेला भरघोस मदत करावी.तसेच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून हेक्टरी एक लाख रूपये व गुराढोरांच्या बाजार किंमती प्रमाणे मदत करत त्यांना धीर द्यावा. सरकारने बाकीच्या लोकप्रिय योजनांवर काही काळ अंकुश लावून सध्याची प्राथमिकता ही फक्त आणि फक्त अतिवृष्टी आणि पुरामुळे संकटात सापडलेल्या लोकांना जास्तीत जास्त सहकार्य करणे आहे हे लक्षात घेऊन त्यांना मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे आणि संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जाण्याची महाराष्ट्राची महान परंपरा कायम ठेवावी ही विनंती यावेळी उपस्थित रामकिसन मस्के सर,विभागीय सदस्य प्रवीण ठोंबरे सर,जिल्हाध्यक्ष शिवश्री राहुल खोडसे, अंबाजोगाई महिला आघाडी अध्यक्ष अश्विनी ताई यादव,सतीश कुंडगर,नारायण मुळे,चौधरी उमेश, खोडसे विशाल, कमलाकर चव्हाण,ओमकार पतंगे जोतिराम माने,पुष्कर रुपदास,अतुल गुजर,केराव टेहेरे,गजानन प्रताप अंबाड, हर्षवर्धन तरकसे, शिवाजी गुजर,मनोज गुजर इत्यादी होते



## राजमोहन बजाज यांचा जागतिक यशाचा सोहळा

# एस.पी.जैन कॉलेज, सिडनी येथून मास्टर्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स पदवी व गोल्ड मेडल



**माजलगाव । दर्शन डोंगरे**

गावातील युवा प्रतिभा राजमोहन गुलाबचंद्र बजाज याने आंतरराष्ट्रीय शिक्षण क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे. पुण्यातील डी.वाय. पाटील कॉलेजमधून बी.ई. (कंप्युटर सायन्स) पदवी पूर्ण केल्यानंतर, फक्त महाराष्ट्रातील निवडक चार विद्यार्थ्यांपैकी एक म्हणून त्याची एस. पी. जैन कॉलेज, सिडनी येथे मास्टर्स ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स या प्रतिष्ठित कोर्ससाठी निवड झाली होती.दिनांक २५ सप्टेंबर रोजी झालेल्या समारंभात राजमोहन याला गोल्ड मेडल मिळाले. निकाल हाती येताच, एका मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपनीकडून त्याला तात्काळ ऑस्ट्रेलियातच नोकरीची ऑफर देण्यात आली.कृत्रिम बुद्धिमत्ता (artificial Intelligence) हा आधुनिक संगणक विज्ञानातील सर्वात महत्त्वाचा आणि भविष्य बदलणारा विषय असून, राजमोहन याच्या या यशामुळे माजलगाव तालुक्याचा मान उंचावला आहे.ही आनंदवार्ता मिळताच माजलगावात श्री सतीशबाप्पा सोळंके, आशिष घाडगे, सतीश राजवन, प्रतापराव रांजवण, शिवाजीभाऊ रांजवण, दिनकर होके, प्रमोद आबा तोर, पांडुरंग काशीद, प्रेम शेठ मांनदणे, वामनराव डक तसेच बजाज परिवार व मित्रपरिवार यांनी मोठ्या उत्साहात पेढे वाटून आनंद साजरा केला.या प्रसंगी श्याम देशमुख, गोविंद चांडक आदी मान्यवर उपस्थित होते.

# नमो युवा रन' मॅरेथॉन स्पर्धेत नशा मुक्त भारताचा संकल्प

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त नशामुक्त भारत निर्माण करण्याच्या संकल्पासाठी भारतीय जनता युवा मोर्चा, अहिल्यानगर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'नमो युवा रन' या भव्य मॅरेथॉन मध्ये डॉ सुजय विखे पाटील यांच्यासह हजारो युवक युवतींनी सहभाग घेवूनय नशा मुक्त भारताचा संकल्प केला. या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून झाली.स्पर्धेचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून करण्यात आला.त्यानंतर मॅरेथॉनमध्ये डॉ विखे यांनी उत्साहाने सहभाग घेतला व विखे पाटील परिवाराच्या वतीने स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

डॉ विखे यांनी युवकांशी संवाद साधताना आजचा युवक आरोग्यदायी, शिस्तबद्ध आणि व्यसनमुक्त भारत घडविण्याच्या ध्येयाने धावत आहे, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेतून या उपक्रमाचा समाजात निश्चितच नवा बदल घडविण्यात मोलाचा वाटा असेल. युवकांच्या आरोग्यपूर्ण जीवनशैलीतून समाजात सकारात्मकता व विकासाची नवी दृष्टी निर्माण होईल असा विश्वास व्यक्त केलाअहिल्यानगर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने युवक या स्पर्धेत सामील झाले. युवकांचा उत्साह, ऊर्जा आणि व्यसनमुक्त भारत घडविण्याचा संकल्प पाहून डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.डॉ. सुजय विखे पाटील यांनी पुढे सांगितले की, अशा स्पर्धांमुळे तरुणाईला आरोग्याचे महत्व पटते, शिस्तबद्धतेची जाणीव निर्माण होते आणि समाजहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते. नशामुक्त भारत ही केवळ घोषणा नसून आपल्या पुढील पिढ्यांसाठी दिलेला आरोग्याचा आणि उज्ज्वल भविष्याचा संकल्प आहे.या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ गार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, युवा मोर्चा शहराध्यक्ष रुद्रेश अंबाडे, दक्षिण युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, उत्तर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, युवा मोर्चाचे पदाधिकारी, सर्व मंडळ अध्यक्ष, सर्व आघाड्यांचे कार्यकर्ते तसेच जिल्ह्यातील युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान उत्साह,पाहण्यास मिळाला.






# सरसकट पंचनामे करा; कोणाच्याही नुकसानीची नोंद राहणार नाही याची काळजी घ्या-आ.नमिता मुंदडा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात सर्वच मंडळात अतिवृष्टीची नोंद झालेली असल्याने सरसकट पंचनामे करावेत. त्यात कोणताही कसुर करू नये. कारण आजच्या या नैसर्गिक आपत्तीत अडचणीत असलेल्या सर्वसामान्यांसाठी आपणच देव आहात म्हणून कोणाचेही नुकसान होणार नाही, याची काळजी घ्या. कारण आपली चुक एखाद्याचे आयुष्य सुधारू अथवा बिघाडू शकते. म्हणून मानवीय मदतीचा दृष्टिकोन तेवत ठेवा, अशा सूचना आ. नमिता मुंदडा यांनी अधिकारी वर्गास केल्या. केज तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या बाबत सर्व विभागाच्या कार्यालय प्रमुखांच्या नैसर्गिक आपत्ती आढावा बैठकीचे आयोजन आ. नमिता मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात काल सोमवारी (दि. २९) करण्यात आले होते. यावेळी आ. मुंदडा या बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे , तहसीलदार राकेश गिड्डे , जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा , कृउबा चे उपसभापती डॉ वासुदेव नेहरकर , भाजपा तालुकाध्यक्ष भगवान केदार , नेताजी शिंदे , सुनील गलांडे , वसंत केदार ,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी , भाजयुमो चे राहुल गदळे , शरद इंगळे , प्रकाश जाडकर , खदिर खुरेशी यांची प्रमुख उपस्थिती होती

पुढे बोलताना आ. मुंदडा म्हणाल्या की, तालुक्यात अनेक छोट्या मोठ्या तलावांचे नुकसान झाले असण्याची शक्यता लक्षात घेत त्यांचे सर्वेक्षण तिन्ही विभागाच्या कर्मचाऱ्यांनी एकत्रितरित्या दोनच दिवसात करावे. रस्ते, शाळा, पुल, विद्युतपोल आदींच्या नुकसानीचेही प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्या. जमीन खरडून गेलेल्या क्षेत्राबरोबरच नदीशेजारी असलेल्या उसाच्या नुकसानीचेही पंचनामे करावेत अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या . तसेच प्रत्येक विभागाने आपापल्या विभागाचे झालेल्या नुकसानीचे अहवाल विहित वेळेत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करा. हे अहवाल त्यांच्यापर्यंत पोहोचले आहेत की नाही याची




देखील खातरजमा करा, अशा सूचना त्यांनी दिल्या. अधिकाऱ्यांना वरिष्ठ स्तरावर काही अडचणी असतील, तर त्या कळवा त्यावर आपण लागेल ती मदत करू, असेही त्यांनी यावेळी सांगितले.तसेच या आव्हानात्मक परिस्थितीत तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तळमळीने केलेल्या कामाचे आ. नमिता मुंदडा यांनी यावेळी कौतुकही केले.तालुक्यात अतिवृष्टीने नुकसान होऊन हतबल झाल्याने आत्महत्या केल्याच्या तीन घटना घडल्या आहेत, पशुधनाच्या नुकसानीच्या वीस घटना नोंद झाल्या आहेत. घरांच्या पडझडीच्या छत्तीस घटना घडल्या असून चाळीस विहिरींचे नुकसान झाले आहे. तर एकशे त्रेचाळीस घरात पुराचे पाणी जाऊन त्या कुटुंबाना तात्पुरते स्थलांतरित करण्यात येऊन प्रत्येक कुटुंबास पाच हजार रुपयांची मदत देण्यात आली. तर शेतजमीन पुराच्या पाण्याने खरडून गेल्याचे ५५७ शेतकऱ्यांनी नोंद केली आहे. तर शेतातील ठिबक, सोलार व पाईप यांच्याही नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी यावेळी दिली. अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे जनावरे दगावली असून काहींच्या घरांचे नुकसान झाले आहे. अशा बाधित शेतकरी व नागरिकांना प्रातिनिधिक स्वरूपात मदत म्हणून धनादेशाचे वाटप आ मुंदडा यांच्या हस्ते यानिमित्ताने करण्यात आले.या बैठकीस गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे , कृषी अधिकारी सागर पठाडे , ता आरोग्य अधिकारी गवळी , नपचे मुख्याधिकारी अजित ढोपे , उपजिल्हारुग्णालयाचे डॉ दत्तात्रय केंद्रे , व सर्वच विभागप्रमुखांची उपस्थिती होती

## केज शहरातील कन्हैय्या इव्हेंट्स्च्या दांडिया महोत्सवात थिरकला महिला वर्ग,महीलांसह युवतीनी ही लुटला आनंद

**केज । प्रतिनिधी**

नवरात्र उत्सवामध्ये नारी शक्तीला खुप विशेष महत्व असते. म्हणून मोठ्या शहरा मध्ये जसे महिलांसाठी दांडीयाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात तसाच दांडिया महोत्सव केज सारख्या छोट्या शहरात महिलां साठी घेण्याचे स्वप्न होते ते या दांडिया महोत्सवाचे आयोजन करून पूर्ण केले व केज शहरातील महिलांना कन्हैय्या इव्हेंटसच्या माध्यमातून एक मुक्त सांस्कृतिक व्यासपीठ आम्ही उपलब्ध करून देवू शकलो याचा मनस्वी आनंद होत आहे असे कन्हैय्या इव्हेंटस्चे संचालक रोहन वेदपाठक यांनी सांगितले.कन्हैय्या इव्हेंटस्च्या माध्यमातून दि.२६,२७,२८ सप्टेंबर २०२५ रोजी उत्सव



फंक्शन हॉल,कानडी रोड केज या शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी दांडिया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या महोत्सवा मध्ये केज शहरातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेवून आनंद घेतला.तीन दिवसीय दांडिया महोत्सवात विविध उपक्रम,आकर्षकविद्यूत रोषणाई,दर्जेदार साऊंड सिस्टीम,सेल्फी पॉईंट महिलांसाठी करण्यात आले होते.समारोप प्रसंगी सहभागी सर्व महिलांना व युवतींना सन्मानचिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला.यावेळी सर्वांनी आनंद लुटत समाधान व्यक्त केले आहे.

## बनसारोळा येथील शेतकरी बांधवांसाठी श्रध्दा जोगदंडचा आदर्श उपक्रम

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची इयत्ता आठवी 'अ' मधील विद्यार्थिनी श्रद्धा अनिल जोगदंड हिने विलक्षण समाजभान दाखवत आदर्श घालून दिला आहे.आपला वाढदिवस साजरा करण्यासाठी पिगी बँकेत जमा केलेले पैसे तिने खर्च न करता, अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे सुपूर्द केले. तिने हा निधी डॉ. अशोकराव थोरात यांच्या स्वाधीन केला. श्रद्धाच्या या सामाजिक जाणिवेच्या कृतीचे



सर्वत्र कौतुक होत असून,लहानग्या वयात दाखविलेला हा मोठा त्याग सर्व विद्यार्थ्यां साठी व समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. गावकऱ्यांसह शिक्षक, शाळा व्यवस्थापन व स्थानिक मंडळींनी तिच्या उपक्रमाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.श्रद्धाने दाखवलेला हा आदर्श समाजातसंवेदनशीलता व परोपकाराची नवी उमेद निर्माण करणारा आहे.

## औसा येथे कानपूर घटनेचा निषेध करत भव्य मोर्चा




**औसा । खालेद काझी**

कानपूरमध्ये घडलेल्या वादग्रस्त घटनेच्या निषेधार्थ औसा शहरात आज मोठ्या संख्येने नागरिकांनी एकत्र येत शांततेत निषेध मोर्चा काढला.मोर्चाची सुरुवात स्थानिक मैदानातून झाली व तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आली. या वेळी नागरिकांनी संविधानिक हक्कांचे रक्षण करण्याची मागणी केली. धर्मीय भावना दुखावणाऱ्या कृतींविरुद्ध कठोर कारवाई व्हावी अशी मागणीही मोर्चात करण्यात आली.मोर्चात सहभागी झालेल्या विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींनी आपले विचार मांडले. त्यांनी सांगितले की, समाजात सौहार्द राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. कोणत्याही धार्मिक भावनांचा अपमान होऊ नये यासाठी प्रशासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.मोर्चा शांततेत पार पडला असून पोलिसांनी योग्य ती सुरक्षा व्यवस्था केली होती.

### तहसीलदारांचे आवाहन अन व्यापारीमहासंघाचा प्रतिसाद

## हातावर पोट असणाऱ्या मजुरांसाठी दिला पंचावन्न हजार रुपयांचा मदत निधी

**केज । प्रतिनिधी**

अतिवृष्टी झाली अन हातावर पोटअसणाऱ्या स्थलांतरित मजुरांचे हाल सुरु झाले हाताला काम नाही मग पोट भरणार कसे अशावेळी नशिबी फक्त उपासमार सुरु झाली त्यांची ही अवस्था तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या कानावर आली अन त्यांनी केलेल्या मदती च्या आवाहनाला केज व्यापारी महासंघाने तात्काळ प्रतिसाद देत अवघ्या अर्धा तासात पंचावन्न हजारांची मदत तातडीने तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे सुपूर्द केली.केज तालुक्यात मागच्या पंधरा दिवसापासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेच आहे पिके पाण्यात गेली अन होत्याचे नव्हते झाले मात्र या अतिवृष्टीचे आणखीनही बरेच



साईड इफेक्ट असून ते आता दिवसेंदिवस समोर येऊ लागले आहेत सोयाबीन काढणीचे दिवस असल्याने तालुक्यात सोयाबीन काढणीसाठी स्थलांतरित मजुरांच्या अनेक टोळ्या मागच्या काही दिवसापूर्वी दाखल झाल्या पण सततच्या पावसामुळे काम तर सोडा त्यांच्या राहण्याचेही वांदे सुरु झाले आतापर्यंत सोबत असलेले धान्य खाऊन पोटाची खळगी भरली पण पुढे कामच नाही मग पोट भरायच कसे ? हा प्रश्न मागच्या तीन चार दिवसांपासून सुरु झाला पण इथ आपल कुणी नाही मग अडचण सांगायची कुणाला हा ही प्रश्न होताच त्यांची ही अडचण केजचे कर्तव्यदक्ष तहसीलदार राकेश गिड्डे यांच्याकडे काहींनी सांगितली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत तहसीलदारांनी केज तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांच्या कडे सदरील बाब सांगितली व काही मदत करता येईल का असा प्रश्न केला सूर्यवंशी यांनी वेळ वाया न घालवता तात्काळ व्यापारी महासंघाच्या व्हाट्सअप ग्रुपवर मदतीची पोस्ट केली अन बघता बघता अर्धा तासातच पंचावन्न हजार दोनशे रुपयांची रक्कम जमली. जमलेली रक्कम घेऊन व्यापारी बांधव यांनी तहसील कार्यालयात जात तहसीलदार गिड्डे यांची भेट घेऊन त्यांच्या कडे जमा झालेली रक्कम सुपूर्द केली त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापारी बांधवानी निधी जमवून दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## रोहित पंडित आणि यशराज पंडित यांनी गोदाकाच्या गावकऱ्यांसह रात्र काढली जागून

### बदामराव पंडित शेताच्या बांधावर

**गेवराई । प्रतिनिधी**

संपूर्ण गेवराई तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे घर, गृह उपयोगी वस्तू, धान्यासह पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यातच गोदावरी आणि सिंदफणा नदीपात्रात सोडण्यात आलेल्या हजारो क्युसेक्स पाण्यामुळे गंभीर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांसह गावकऱ्यांना धीर देण्यासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करत शेतकऱ्यांना धीर देत आहेत तर त्यांचे पुतणे युवा नेते रोहित पंडित आणि मुलगा यशराज पंडित यांनी गोदावरी काठच्या गावकऱ्यांसोबत रात्र जागून काढली आहे.गेवराई तालुक्यात अतिवृष्टी आणि गोदावरी आणि सिंदफणाच्या पात्रात आलेल्या दुथडी पाण्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. बहुतांश गावातील घरांमध्ये पाणी शिरल्याने गृह उपयोगी वस्तू,



कपडे, कागदपत्र यासह घरातील धान्य सर्व भिजून गेले आहे. आसमानी संकटामुळे शेतातले हाती येणारे उभे पीक सुद्धा जमीनदोस्त झाले आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करणे आणि मानसिक धीर देणे अत्यंत गरजेचे आहे. याची जाणीव ठेवून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित तालुक्यातल्या वेगवेगळ्या गावांतील थेट शेतात आणि शेताच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करत शेतकऱ्यांना धीर देत आहेत. तेथूनच महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून शेतकऱ्यांच्या आर्थिक मदतीसाठी प्रयत्न करत आहेत. त्यातच पैठणच्या नाथसागरातून गोदावरी पात्रात ३ लाख क्युसेक्स पेक्षा अधिक पाणी सोडल्याने पात्रालगतच्या गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. सदर पाणी रात्री सोडल्याने युवानेते रोहित पंडित आणि युवानेते यशराज पंडित हे गोदाकाठच्या गावकऱ्यांसोबत रात्रभर जागेच होते. गावाला पाण्याचा वेढा पडण्या अगोदरच गावकऱ्यांना गावाबाहेर काढण्यासाठी दोघांनीही परिश्रम घेतले. बदामराव पंडित यांचे पूर्ण कुटुंब पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी अहोरात्र झटत असल्याने आम्हाला मोठा मानसिक आधार मिळत असल्याचे अनेक गावकऱ्यांनी सांगितले.

## प्लेसमेंट ड्राइव्हद्वारे शंभराहून अधिक विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

**नंदुरबार । दिपक गोसावी**

सौ. मीना किशोर दराडे एज्युकेशन सोसायटी, नंदुरबार यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्लेसमेंट ड्राइव्ह कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने यांत्रिक (Mechanical), विद्युत (Electrical) तसेच औषधनिर्माण (झहरीरलर्शीींळलरश्र) क्षेत्रातील नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांची निवड केली. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.या कार्यक्रमाचे आयोजन शुभम दराडे यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. कार्यक्रमाचे समन्वयन फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. धनंजय पाटील यांनी केले. प्रशासनिक अधिकारी सचिन भोंगणे तसेच पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य यशवंत हिरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभलेनंदुरबारसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही पहिलीच संधी होती, जिथे बहुराष्ट्रीय कंपन्या थेट येऊन त्यांच्या कौशल्यांची पाहणी केली. यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन व्यावसायिक आणि औद्योगिक अनुभवाची माहिती मिळाली. तसेच, त्यांचा स्वावलंबन व आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली आहे.या मेगा प्लेसमेंट ड्राइव्हमुळे स्थानिक विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी तसेच भविष्यातील करिअरच्या दृष्टीने मोठा मार्गप्रकाश मिळाला असून, समाजात या उपक्रमाचे अत्यंत सकारात्मक उदाहरण तयार झाले आहे.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून आयोजक मंडळाचे मनःपूर्वक कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077